Vol 4 Issue 5 Nov 2014

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-5 | Nov-2014
Available online at www.aygrt.isrj.org

# भारतीय लोकशाही समोरील एक प्रमुख आव्हान

**माने प्रकाश रंगराव**

असोसिएट प्राध्यापक , राज्यशास्त्र विभाग , आर्टस, सायन्स, ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
रामानंदनगर(बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

**सारांश :-** ''भ्रष्टाचारास आळा घालणे हे केवळ तात्विक पातळीवरच नव्हे तर व्यवहारिक पातळीवर आवश्यक आणि अपरिहार्य आहे.''

## प्रस्तावनाः—

प्रशासनातील भ्रष्टाचार ही आधुनिक युगाची समस्या नाही, तर ऐतिहासिक काळातही ही समस्या होती असे दिसून येते.कौटिल्य याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात भ्रष्टाचार व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यावर चर्चाझालेली दिसून येते.'जिभेवर पडलेल्या मधाची चव मनुष्य सहजपणे चाखतो, त्याप्रमाणे शासनाचा महसूल वसूल करणारे,अधिकारी त्यातील काही उत्पनाचा उपभोग घेणे त्यांना सहज शक्य होते असे कौटिल्याचे म्हणणे होते.   शासनाची कार्ये वाढत असताना त्यासाठी निर्माण झालेले नियम, परवाने, नियंत्रणं यामधून अधिकाऱ्यांच्या कामाची व्याप्ती वाढत जाते व त्यातून भ्रष्टाचाराची निर्मिती होते.

स्वातंत्र्योत्तर काळात लोकप्रशासनाची व्याप्ती विस्तारली,त्याच्या अधिकारात वाढझाली आणि परिणामत: भ्रष्टाचाराची क्षेत्रेदेखील व्यापक बनली. सनदी सेवकांना अनेक कार्ये करण्याचे अधिकार दिले. त्यांच्यासमोर अनेक समस्या होत्या. त्यासाठी देशांच्या नोकरशाहीला अमाप सत्ता देण्यात आली. काही बाबतीत नोकरशाहीने सर्वंकष सत्तेचा उपभोग घेतला, हाती आलेल्या सत्तेचा दुरूउपयोग सुरू झाला. मात्र नव्या मात्तबर भागीदारांचे कृपाछत्र  प्रशासकांना लाभत गेले आणि त्यामुळे भ्रष्टाचाराचे नवनवीन प्रकार जन्मास येऊ लागले. त्यामुळे भ्रष्टाचाराचा विषवृक्ष फोफावू लागला आहे आणि विकासकार्यातील भ्रष्टाचार हा सर्वात मोठा अडसर आहे.

## संशोधनाचा उद्देश :

प्रचंड साधनसंपत्ती, कुशल मनुष्यबळ असणारा व जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जाणारा भारत लाचखोरी आणि भ्रष्टाचारात अडकून पडला आहे.त्याची प्रमुख कारणे व त्यावर काय उपाय आहेत का? याचा शोध घेणे हा प्रमुख उद्देश या संशोधनामागील आहे.

## संशोधन विषयाची उद्दीष्टये :

भारतीय लोकशाही समोरील 'भ्रष्टाचार' एक प्रमुख आव्हान प्रशासनातील 'भ्रष्टाचार ' या विषयाचे अध्ययन अर्थपूर्ण होण्यासाठी चिकित्सक संशोधन पध्दतीच्या आधारे दुय्यम साधनाद्वारे पुढील उद्दीष्टये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) भ्रष्टाचाराची संकल्पना स्पष्ट करणे.
२) भ्रष्टाचाराच्या कारणांचा शोध घेणे.
३) भ्रष्टाचाराचे होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
४) भ्रष्टाचार निर्मूलनासाठी उपाययोजना सुचविणे.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन आणि विश्लेषण पध्दतीचा अवलंब करून, संशोधन विषयाशी संबंधित व्दितीय माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ,मासिके, विशेषांक, वर्तमान पत्रातील लेख, साप्ताहिक इ. आधारे हा लघू संशोधन प्रकल्प तयार करण्यात आलेला आहे.

## भ्रष्टाचार म्हणजे काय? :

'' भ्रष्टाचार म्हणजे नीतिशास्त्राने आचरण्यासाठी सांगितलेल्या तत्वांना सोडून केलेले वर्तन होय''

''भ्रष्टाचार याशब्दाचा साधा व सरळ अर्थ 'भ्रष्ट','आचार', 'आचार'म्हणजेच वर्तन, चाल, रीत आणि 'भ्रष्ट' म्हणजे पतित झालेला, अपवीत्र, झालेला असा अर्थ होतो.

### *भ्रष्टाचार अर्थ :*

“ नियमबाहय वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय” थोडक्यात भ्रष्टाचाराचा महत्वाचा अर्थ ‘कर्तव्यच्यूत’ होणे असा आहे.

### *भ्रष्टाचाराचे स्परूप :*

भ्रष्टाचार हा कोणत्याही समाजाचा स्थायीभाव बनला आहे. फक्त भ्रष्टाचाराचे प्रकार आणि प्रमाण हे कमी–अधिक असतात. माणूस संघटीत होऊन राहण्याचे शिकला तेव्हापासून भ्रष्टाचार अस्तित्वात आला आहे.

आज आपल्या देशात तसेच जगातल्या प्रत्येक देशात भ्रष्टाचार थैमान घालत आहे. असे दिसून येते. राजकीय पक्ष आणि उद्योजक, व्यापारी सर्वच प्रकारच्या राज्यव्यवस्थेत नोकरशाहीचा खाक्या बहुतेक सारखाच असतो.त्यातून जे सरकार खऱ्या अर्थाने लोकभिमूख असते तेथे नोकरशाहीचा व्यवहार बराच वेगळा म्हणजे स्वच्छ व कार्यक्षमतेने चालवला जातो.आपल्या भारतातील आजची नोकरशाही ही ब्रिटीश साम्राज्यशाहीचा वारसा पुढे चालवित आहे आणि आपल्या सरकारची लोकभिमुखता जशी – जशी कमी होत गेली आणि राज्यकर्ते भ्रष्टाचारी मार्गाकडे वळले, तस –तशी नोकरशाहीतील भ्रष्टाचाराने उचल खालेली दिसून येते.

भ्रष्टाचार समाज जीवनालाच लागलेला रोग आहे आणि तो वेगवेगळया स्वरूपात विविध सामाजिक संबंधातून व्यक्त होत असतो. लोकशाही प्रशासनाची समाजभिमूख स्वरूप पाहाता त्याला सर्वात मोठा धोका कोणत्याही तणावापेक्षा भ्रष्टाचारी प्रवृत्तीतून अधिक दिसून येतो. अर्थात आज ही समस्या आपल्या देशापुरती मर्यादित राहिलेली नाही. ती जगातील समस्या बनलेली आहे. जेथे अधिकाराचा वापर करण्याची वैकल्पीक मुभा दिली जाते. तेथे प्रशासकीय अधिकाऱ्यामध्ये भ्रष्टाचार करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. प्रशासन हे सरकारचे कार्यकारी अंग आहे. सरकार गरीबांच्या सर्वांगिण विकासासाठी विकास योजना तयार करते, त्याची अंमलबजावणी प्रशासन करीत असते. विकासाच्या योजना राबविताना हा भ्रष्टाचार होतो. मग त्या योजना कोणत्याही असोत याविषयी राजीव गांधी म्हणतात “ जेव्हा केंद्रातून एक रूपया मंजूर होतो. तेव्हा तो घासून त्यातून फक्त पंचवीस पैसेच गरिबांसाठी खर्च होतात. अशा प्रकारे भारतीय प्रशासनातील भ्रष्टाचार त्यांनी सांगितलेला आहे.

राजकारणी हे नोकरशहांना भ्रष्ट करतात की, नोकरशहा राजकारण्यांना भ्रष्ट करतात हा वाद कोंबडी की अंडे इतका सनातन आहे; परंतु एक मात्र खरे की, दोघे मिळून जनतेची पूर्णपणे छळवणूक करतात.

### *विषय प्रवेश :*

सत्ता माणसाला भ्रष्ट करते व अधिसत्ता माणसाला अधिक भ्रष्ट करते , असे लास्कीने सांगितलेले आहे. आज भ्रष्टाचार हा दैनिक अनुभवाचा विषय बनला आहे. लाखो लाचखोरीची प्रकरणे भिजत पडलेली आहेत. देशात कायद्याचा प्रचंड ढीग पडला आहे. प्रचलित कायद्यातील पळवाटांमुळे सारे कायदे प्रभाव शून्य झालेले आहेत. कायद्यातील पळवाटा आणि त्याची लवचीक अंमलबजावणी यामुळे सामान्यांना न्याय मिळणे दुरापास्त झालेले आहेत. आजचे कायदे न्यायासाठी आहेत की, अपराध्यांना अभय देण्यासाठी आहेत. ही बाब शोधण्याची वेळ आलेली आहे; कायदे राबविणारेच कायदे मोडण्यात तरबेज झालेले आहेत. त्यामुळे कायद्यांचा धाक या देशात कोणालाच राहिलेला नाही. म्हणून या देशात गुंडगिरी, पिळवणूक, शोषण, काळाबाजार, साठेबाजी, समलिंग, माफियागिरी या अत्याचाराबरोबरच भ्रष्टाचाराचे अक्राळविक्राळ रूप वाढलेले आहे.“ भारतातला भ्रष्टाचार आता कर्क रोगासारखा प्रसरला आहे.” भारत हा जगातील सर्वात भ्रष्ट देश बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. त्याची कारणे शोधने गरजेचे आहे.

### *भ्रष्टाचाराची कारणे :*

भ्रष्टाचाराची अनेक कारणे आहेत. भ्रष्टाचाराची जी कारणे सांगितली जातात ती साधारत: सर्वच आयोग अथवा समित्यांनी सांगितलेली दिसून येतात.

### *1.प्रतिष्ठा :*

भारतीय समाजामध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा ही त्याच्याजवळ असणार पैसा,स्थानिक मालमत्ता यांच्याशी संबंधित असते. त्यामुळे प्रतिष्ठा मिळविण्यासाठी व्यक्ती मग ती सामान्य नागरिक असो किंवा सनदी नोकर असो भ्रष्टाचाराचा मार्ग स्वीकारताना दिसते. सनदी सेवकांना संपत्तीची, मान सन्मानाची अभिलाषा असल्यामुळे तो विविध अमिषंना बळी पडतो. टेबला खालून आलेल्या पैशाचा स्वीकार करून किंवा भेट वस्तूंचा स्वीकार सेवक प्रशासकीय नियमांना डावलून, वाममार्ग स्वीकारतो अशा वेळी संपूर्ण समाज व्यवस्थेत भ्रष्टाचार ही विकृती फेलावते.

### *2.भ्रष्टाचाराबद्दल कडक शिक्षा नाही :*

प्रशासनात भ्रष्टाचाराबद्दल कोणतेही कडक शिक्षा दिली जात नाही. भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीचा गुन्हा जो पर्यंत न्यायालयात सिध्द होत नाही तो पर्यंत तिला कोणतीही शिक्षा दिली जात नाही.  हा दीर्घ कालावधी असल्यामुळे समाजात भ्रष्टाचार करणारा वर्ग उजळ माथ्याने फिरतो आणि लोकही त्याचे कौतुक करतात याचा अर्थ भ्रष्टाचार ही एक सामाजिक प्रतिष्ठाच आहे आणि शिक्षाही होत नसल्याने भ्रष्टाचराचे प्रमाण वाढते.

### *3.भ्रष्टाचाराला नागरिकांचा पाठिंबा आहे :*

प्रशासकीय भ्रष्टाचाराला अप्रत्यक्षपणे नागरिक सुध्दा जबाबदार आहे.भ्रष्टाचाराला लाच घेणारा व लाच देणारा हे दोघेही जबाबदार असतात. लोक कधी कधी आपली कामे ताबडतोब व्हावीत यासाठी, तर कधी कधी नियमबाहयकामे करवून घेण्यासाठी स्वत:च लाच देतात. त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढते.

### *4.आर्थिक कारण :*

वाढत जाणरी महागाई, जीवनावश्यक वस्तूंचा होणारा काळाबाजार, वाढत्या गरजा आणि मिळणारी मर्यादित मिळकत इत्यादींमुळे सनदी सेवक भल्याबुऱ्या मार्गाचा अवलंब करून संपत्ती मिळवू पाहतो. भारतात जोपर्यंत आर्थिक विषमता आहे. तोपर्यंत भ्रष्टाचाराचे निर्मूलन होणे कठीण आहे. भांडवलदार वर्ग संपत्तीच्या जोरावर प्रशासकीय नोकरांना आपलेसे करतो त्यांना संपत्ती, भेट वस्तू देऊन खुश ठेवतो. काळा पैसा सुरक्षित ठेवण्यासाठी सुध्दा श्रीमंत लोक प्रशासनातील वरीष्ठ अधिकाऱ्यांना लाच देऊन प्रलोभन दाखवून गैरवर्तनास प्रवृत्त करतात.

### *5) प्रशासकीय कारण :*

आधुनिक जीवन हे गुंतागुंतीचे व धावपळीचे आहे. कोणाकडेही वेळ आणि संयम राहिलेला नाही आणि एवढेच नव्हेतर प्रशासकीय कामकाजाचा व्यापही वाढलेला आहे. अशा परिस्थितीत काहीतरी प्रलोभन दिल्याशिवाय प्रशासकीय कामकाज होत नाही. असा लोकांचा समज झाला आहे. त्यातूनच प्रशासकीय भ्रष्टाचाराचा उगम झालेला दिसून येतो.

### *6) भ्रष्टाचाराविरूध्द जागृत लोकमताचा अभाव :*

जोपर्यत भ्रष्टाचाराविरूध्द लोकांची मानसिकता तयार होत नाही. तोपर्यंत भ्रष्टाचार कमी होणार नाही.पण सध्याच्या धावपळीच्या काळात कार्य प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वाट पाहणे. त्यासाठी संयम बाळगणे हया गोष्टी लोकांना असाहय वाटतात. तात्काळ काम करून घेण्यासाठी प्रलोभनाशिवाय मार्ग नसल्यामुळे भ्रष्टाचार फोफावतो. म्हणून त्याविरूध्द कोणीही आवाज उठवत नाही.

### *7) जटील कामकाज पध्दती :*

सध्याची कोणतीही प्रशासकीय कामकाजाची प्रक्रिया अतिशय जटिल व गुंतागुंतीची झाली आहे. कोणत्याही कार्यात नियम, उपनियम यांचा विचार होतो. त्यातच एका कार्यासाठी अनेक टेबलवर ती फाईल जाणे. इत्यादी मुळे कोणतेही काम सहज सुलभ होत नाही. ते काम सुलभ करून घेण्यासाठी पैसा – दिला – घेतला जातो.

### *8) भारतातील असमर्थ कायदे पध्दती :*

भारतातील भ्रष्टाचारा विषयीचे कायदे कडक नाहीत. त्याचे परिणामकारकपणे अंमलबजावणी होत नाही. हे कायदे करणारे कायदे पंडीतच भ्रष्टाचारात गुंतलेले असताना कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे कशी होणार?

### *9) सनदी सेवकाला संरक्षणाचा अभाव :*

भारतातील सनदी सेवकाला घेण्यात येणाऱ्या संरक्षण अभावी सुध्दा भ्रष्टाचार होतो. उदा. सनदी सेवकांना मिळणारा कमी पगाार व इतर सवलती सेवानिवृत्तीचे वेतन इत्यादी मध्ये बऱ्याच त्रुटी असल्याने त्यात आढळणारा कमीपणा भरून काढण्यासाठी सनदी सेवक भ्रष्टाचार करताना दिसतात.

### *भ्रष्टाचारासाठी आणखी कांही वेगळी कारणे ही दिसून येतात.*

१) अपुरे शिक्षण व प्रशिक्षण.
२) कमी वेतन
३)सनदी सेवकांचे राजकीय अधिकार
४) विलंबकारी वा दीर्घसूची प्रक्रिया, योजनापध्दती
५) निकृष्ट जनमत (चववत चनइसपब वचपदपवद)
६) वरिष्ठांकडून आदर्शाचा अभाव.
७) भ्रष्टाचारा विरूध्द तक्रार करण्याची अनिच्छा
८) कायद्यातील त्रुटी, पळवाटा.
९) त्रासिक व खर्चिक न्यायव्यवस्था.

### *भ्रष्टाचाराचे होणारे परिणाम :*

भ्रष्टाचाराचा परिणाम म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.५टक्के उत्पन्न घटते. विशेषत: उद्योगकांना व्यावसायिक अनिश्चिततेला तोंड द्यावे लागते.भ्रष्टाचारासाठी द्यावी लागणारी किंमत उत्पादन खर्चात समाविष्ठ करावी लागते व त्यातून उत्पादन खर्च वाढतो. आंतराष्ट्रीय स्पर्धेत उद्योजकांना टिकाव धरणे अवघड होते. एकूण गुंतवणुकीवर त्याचा प्रतिकुल परिणाम होतो व त्यातुन उत्पादन घट, रोजगारघट, किंमत वाढ असे दुष्टचक्र सुरु होते. प्रचंड साधन संपत्ती असणारा, कुशल मनुष्यबळ असणारा व जगातिल तिसरी मोठी अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जाणारा भारत लाचखोरी आणि भ्रष्टाचारात आडकून पडला आहे. यातून सरकारकडे शिक्षण , आरोग्य , वीज पाणीपुरवठा , रस्ते अशा आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी निधीची कमतरता जाणवते. मग खाजगी करणाऱ्या माध्यामातून असा सुविधा वाढीव किंमतीने सर्वसामान्यांना घ्याव्या लागतात. या मुलभूत सुविधा खर्चिक झाल्याचा सर्वाधिक फटका गरिबांना बसतो.भ्रष्टाचाराची साखळी आणि तळापासून वरिष्ठापर्यंत वाटेकरी झाल्याने भ्रष्टाचार हा वाईट आहे.असे वाटण्या ऐवजी तो

नियमच म्हणून स्वीकारला जात आहे. त्यामुळे आपले काम नियमाप्रमाणे, निर्धारी शासकीय फी किंवा शुल्क देऊन होईल. असे उद्योजकांना नव्हे तर सर्वसामान्य जनतेला ही वाटत नाही. त्यामुळे अपवादात्मक काही तुरळक अनुभव सोडले तर ही व्यवस्था म्हणून स्वीकारले गेली आहे.

### *भ्रष्टाचार र्निमूलनासाठी उपाय योजना :–*

भारतीय लोकशाहीच्या उज्वल भविष्यासाठी व लोकशाही वाचवण्यासाठी, भारतीय समाज्याला शुद्र , सात्वीक , चारित्र्यसंपन्न बनवण्यासाठी भ्रष्टाचाराचे र्निमुलन होणे आवश्यक आहे त्यासाठी काही उपाय योजना –

१) राजकीय नेते व सरकारी नोकर यांची खाजगी मालमत्ता सेवेत रूजू होताना नमूद करावी व दर पाच वर्षानी आढावा घ्यावा.
२) शासकीय प्रक्रिया सरळ व सोप्या कराव्यात, ''एक खिडकी , एक टेबल'' सारख्या योजनेची सर्वत्र अंमलबजावणी करा.
३) नागरिकांमध्ये भ्रष्टाचारा विरूध्द जनजागृती निर्माण करणे.
४) भ्रष्टाचारी व गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकांना राजकारणात प्रवेश देऊ नये.
५) जनतेची गाऱ्हाणे ऐकण्यासाठी व त्यांचे निवारण होण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय सुधार आयोगाचे स्थापना करणे.
६) भ्रष्टाचाराच्या विळख्यातून या देशाला बाहेर काढण्यासाठी ,''भ्रष्टाचार हा देशद्रोही अपराधाच्या कलमा खाली आणण्याची गरज आहे.
७) भ्रष्टाचाराची प्रकरणे विनाविलंब निकाली काढण्यासाठी खास जलद न्यायालयाची स्थापना करावी.
८)भ्रष्टाचारी व्यक्ती किती मोठया पदावर आहे हे मुळीच पाहू नये,  सर्वासाठी एकच मोजमाप लावावे.
९) भ्रष्टाचारी लोकांस जामिन देऊ नयेत.
१०) भ्रष्टाचारी व्यक्तीवरआरोप सिध्द होताच तात्काळ शिक्षेची अंमलबजावणी करावी.
११) भ्रष्टाचारी व्यक्तीची संपूर्ण मालमत्ता विनाविलंब तात्काळ जप्त करावी.
१२) भ्रष्टाचारी कुंटुबियांना किमान दहा वर्ष तरी सर्व सोई सवलती पासून दूर ठेवावे.

या सारख्या अनेक उपाय योजना सुचवता येतील. त्यापैकी काही उपाय ही अमानवी वाटण्याची शक्यता आहे. काही उपाय अमलात आणणे अवघड वाटत असले तरी, भ्रष्टाचाराचा विषवृक्ष आक्राळविक्राळ स्वरूपात पसरत चालला आहे. त्याच्या फांदया वेळीच छाटल्या पाहीजेत. भ्रष्टाचार छोटा असू किंवा मोठा त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये. राजकारणाच्या भूलथापांना जनतेने बळी पडता कामा नये. लोक फार विसराळू आहेत. त्यांनी सतत सतर्क राहिले पाहिजे,'' भ्रष्टाचार हटाव – देश बचाव '' हा नारा देऊनभ्रष्टाचार र्निमुलनाचे शस्त्र हाती घेतले पाहिजे.

### *अनुमान :–*

' ज्या विद्युतगतीने भ्रष्टाचार देशातील सर्वच क्षेत्रात पोहोचला आहे.' ती गती भयावह व चिंताजनक आहे. ज्या देशाची न्याय आणि शिक्षण व्यवस्थाच भ्रष्टाचाराच्या विळाख्यात अडकते तथे मती मंद होते. भ्रष्टाचारी लोकप्रतिनिधींनी आणि नोकरशाहींने आपला देश पुढे नेण्याऐवजी ५० वर्षेतरी मागे नेला आहे.

पंचवार्षिक योजनांतून विकासाची जी कार्ये निश्चित केली होती. ती जर व्यवस्थितरित्या भ्रष्टाचार न होता पूर्ण केली गेली असती, तर आजचे विषमतेचे चित्र दिसले नसते.सर्वांचा चांगला विकास झाला असता. जनतेने प्रामाणिकपणे या समस्येकडे पाहिले असते,तर ही समस्या कधीच सुटू शकली असती आणि जगाने भारताकडे एक प्रगत राष्ट्र, एक विकसित राष्ट्र, एक संपन्न राष्ट्र म्हणून पाहिले असते; परंतूदुर्दैव असे की, भ्रष्टाचाराच्या निरनिराळया प्रकाराने प्रशासकीय व्यवस्था पार पोखरून निघाली आहे.

### *निष्कर्ष :–*

भारतीय प्रशासनात भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे. सूशासनासाठी प्रथम लोकपाल व लोक आयुक्त संस्था राजकीय स्तरावर मजबूत करणे आवश्यक आहे. पदाधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार कमी झाला की, आर्थिक अफरातफरिचे आज दिसत असलेले घोटाळे व अपहार कमी होतील. भ्रष्टाचार निर्मूलन संस्था अधिक सतर्क व्हाव्यात, भ्रष्टाचाराच्या विरोधात राजकीय, सामाजिक जन आंदोलन उभे केल्यशिवाय आणि जनतेने राजकारणांच्या भूलथापांना बळी न पडता 'भ्रष्टाचार हटाव–देश बचाव' हा नारा घेऊन भ्रष्टाचार निर्मूलनाचे शस्त्र आपल्या हाती घेतल्या शिवाय भ्रष्टाचार निर्मूलन होणार नाही, असे एकंदरित मला वाटते.

### *समारोप :*

भ्रष्टाचारामुळे आज समाजात सर्वच स्थरावर गैरमार्गाने, अवैध पध्दतीने जादा पैसा कमविण्याची अपप्रकृती वाढत आहे. राजकीय नेते व लोकशाही यांच्यामध्ये भ्रष्टाचाराबाबत साटेलोटे होऊन भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे. भ्रष्टाचारामूळे समाजात लोकशाही बाबतचिड व संताप निर्माण होत आहे. म्हणून भ्रष्टाचार रोखने अथवा भ्रष्टाचाराचे निर्मूलन करून समाजाला स्वच्छ व पारदर्शक सरकार देणे हे आधुनिक लोकशाही समोरील एक आव्हान निर्माण झाले आहे. कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार करुन कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन निर्दोष सुटणारे भ्रष्ट नेते व अधिकारी पाहून समाजाने संतप्त होवून लोकशाहिचा त्याग का करु नये? असा विचार भारतीय नागरिक करताना दिसून येतो.

''श्रम करुन श्रीमंत होण्यास कोणाचीही मनाई असणार नाही; परंतु कसलेही श्रम किंवा नोकरी न करता करोडोची माया जमविणाऱ्यांना एक दिवस जनतेसमोर जाब द्यावाच लागेल. भ्रष्टाचाराच्या मार्गाने धनिक होता कामा नये. हे लोकशाहीच्या रक्षकांनी नीट ध्यानात घेणे आवश्यक आहे.''

### *संदर्भ ग्रंथ सुची :*


१)प्रा. के. आर. बंग –विकास प्रकाशन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

२)प्रा. के. आर. बंग –कर्मचारी वर्ग प्रशासन विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

३)के. सागर –समग्र राज्यशस्त्र, के सागर प्रकाशन, पूणे

४)ज. रा. शिंदे–समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

५)प्रा. बी. टी. देशमुख– भारतीय राजकीय व्यवस्था.

६)नंदिनी पंडित– जागतिकीकरण आणि भारत.

७) बी.बी.पाटील–लोकप्रशासन,फडके प्रकाशन कोल्हापूर.

८)डॉ.अशोकजैन–प्रारंभिक राज्यशास्त्र, सेठ प्रकाशन मुंबई.

९)अमरनाथ चंडालिया– भ्रष्टाचार आणि भांडवलशाही.

१०)चि. ग. घांगरेकर–राज्यशास्त्राची मूलतत्वे.

११)बा. सी. काणे– भ्रष्टाचार आणि लोकशाही.

१२)डॉ. बा.भा. पाटील.–प्रशासकीय भ्रष्टाचार.

१३)आ. शांताराम गरुड–भ्रष्टचार आणि भ्रष्टाचार निर्मूलन.

१४)माधव गोडबोले.– भ्रष्टाचाराचा भस्मासूर एक जाहिरनामा.

१५)सुहास पळशीकर.–भ्रष्टाचार विरोधी आंदोलने परिणाम शून्य का ठरतात?





***माने प्रकाश रंगराव***

असोसिएट प्राध्यापक , राज्यशास्त्र विभाग , आर्टस, सायन्स, ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर(बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org